सातारा जिल्हा परिषद, ग्रामपंचायत विभाग
दूरवनी क्रमांक ०२१६२/२३३८४३ ईमेल vptzpsatara२@yahoo.in

---

जा. क्र.ग्रापं/५/कावि/ग्राउभाउ/२०१६, दि.ᏓᏅ /४/२०१६
३५६२

प्रति,

गट विकास अधिकारी,
पंचायत समिती .... (सर्व)
जिल्हा सातारा

विषय :-**दि.१४ एप्रिल,२०१६ ते दि.२४ एप्रिल, २०१६ या कालावधीत सर्व ग्रामपंचायतींमध्ये " ग्राम उदय से भारत उदय अभियान" राबविणेबाबत...**

संदर्भ :- 1) महाराष्ट्र शासन, ग्राम विकास विभाग, शासन निर्णय क्रमांक व्हीपीएम/2016/प्रक्र117/ पंरा-3 दिनांक 6 एप्रिल, 2016.
2) या कार्यालयाकडील पत्र क्र.ग्रापं/5/ग्राउभाउ/2016 दिनांक 4/4/2016.

भारत सरकारच्या पंचायत राज मंत्रालयाने दिलेल्या निर्देशाच्या अनुषंगाने दिनांक 14 एप्रिल, 2016 (डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती) ते दिनांक 24 एप्रिल,2016 (राष्ट्रीय पंचायत राज दिवस) या कालावधीत **"ग्राम उदय से भारत उदय अभियान"** राज्यातील सर्व ग्रामपंचायतंमध्ये राबविण्याबाबत वरील संदर्भ क्र.1 अन्वये महाराष्ट्र शासनाच्या ग्राम विकास विभागाने शासन निर्णय निर्गमित केला आहे.

ग्राम उदय सेव भारत उदय अभियान राबविणेबाबत MoPR च्या वेबसाईटवर दिनांक २३.३.२०१६ चे पत्रासोबत प्रसिध्द करण्यात आलेल्या केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचना विचारात घेऊन उपरोक्त संदर्भ क्र. 2 अन्वये या कार्यालयाने सविस्तर सूचना निर्गमित केल्या आहेत.

मा.जिल्हाधिकारी, सातारा यांचे अध्यक्षतेखाली दिनांक 6/4/2016 रोजी जिल्हास्तरीय अंमलबजावणी व संनियंत्रण समितीची सभा घेण्यात आली. या सभेत मा.जिल्हाधिकारी यांनी सदरचे अभियान अत्यंत प्रभावीपणे राबविणेच्या व अभियानात विविध उपक्रम हाती घेण्यासंदर्भातील सूचना विविध विभागांना दिल्या आहेत.

उपरोक्त शासन निर्णय दिनांक 6 एप्रिल, 2016, या कार्यालयाचे पत्र दि. 4 एप्रिल, 2016 आणि दि.6 एप्रिल, 2016 च्या जिल्हास्तरीय अंमलबजावणी व संनियंत्रण समिती सभेतील सूचना विचारात घेऊन आपणास पुढीलप्रमाणे सूचना देणेत येत आहेत.

१) शासन निर्णय दिनांक ६ एप्रिल, 2016 मधील सूचनांची काटेकोर अंमलबजावणी करावी.
२) शा.नि.६ एप्रिल, 2016 अन्वये, दिनांक १४ ते १६ एप्रिल 2016 या कालावधीत आयोजित करावयाच्या सामाजिक सलोखा व अभिसरण कार्यक्रमासाठी जिल्हा समाजकल्याण अधिकारी जिल्हा परिषद,सातारा यांची समन्वय अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.

तसेच दिनांक १७ ते २० एप्रिल, 2016 या कालावधीत आयोजित करावयाच्या ग्राम किसान सभांचे आयोजनासाठी जिल्हा कृषि अधिकारी, जिल्हा परिषद सातारा यांची समन्वय अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.

उपरोक्त दोन्ही समन्वय अधिकारी यांचेशी आपलेस्तरावरुन वेळोवेळी समन्वय साधून सदरचे कार्यक्रम प्रभावीपणे राबविणेसाठी आवश्यक ते नियोजन करणेत यावे.

३) दिनांक २१ ते २४ एप्रिल, 2016 या कालावधीत आयोजित करावयाच्या राष्ट्रीय पंचायत राज दिन-ग्रामसभांच्या आयोजनाबाबत शासन निर्णयात नमुद केलेनुसार **ग्रामपंचायतनिहाय संपर्क अधिकारी** यांच्या नियुक्ती कराव्यात. तसेच ग्रामसभा आयोजनासाठी ग्रामपंचायतनिहाय ग्रामसेवक व अन्य कर्मचारी यांच्या नेमणूका कराव्यात.

४) ग्रामसभेची प्रसिध्दी, पूर्वतयारी, कार्यवृत्त् लिहिणे, छायाचित्रे काढणे, बैठकीचा अहवाल देणे इ.साठी शासन निर्णयातील सूचनांनुसार ग्रामपंचायतीच्या सभेमध्ये जबाबदारी व कर्तव्यांचे वाटप् करणेबाबत आपलेस्तरावरुन सूचना द्याव्यात.

५) ग्रामसभेच्या यशस्वीतेसाठी ग्रामपंचायत स्तरावरील कर्मचारी (उदा.ग्रामसेवक, ग्राम रोजगारसेवक, अंगणवाडी सेविका, आशा वर्कर, ANM, शिक्षक यांचे सहकार्य घ्यावे.

६) विशेष ग्रामसभेची सूचना शासन निर्णयातील मुद्दा क्र.7 मध्ये नमुद केलेनुसार कार्यवाही करुन सर्व नागरीकांपर्यंत पोहचविण्याची दक्षता घेण्यात यावी.

७) विशेष ग्रामसभेपूर्वी वॉर्ड सभा व महिला ग्रामसभा आयोजित करणे कायद्याने बंधनकारक आहे. त्यादृष्टीने सर्व ग्रामपंचायतींना सूचना निर्गमित कराव्यात.

८) दिनांक २१ ते २४ एप्रिल, २०१६ या कालावधीत प्रभात फेरी, स्वच्छता अभियान, सांस्कृतिक कार्यक्रम, क्रिडा स्पर्धा, ज्येष्ठ नागरीकांचा सन्मान करणे इ.उपक्रम हाती घ्यावयाचे आहेत. त्यानुसार गट शिक्षणाधिकारी यांचेमार्फत् केंद्रप्रमुख, मुख्याध्यापक यांना ग्रामपंचायत स्तरावर असे उपक्रम प्रभावीपणे आयोजित करण्याच्या सूचना निर्गत कराव्यात.

९) तीन टप्प्यतील अभियानानंतर, प्रत्येक टप्प्यावर म्हणजेच दि. १७.४.२०१६, दि.२१.४.२०१६ व दि.२४.४.२०१६ रोजी ग्रामपंचायत निहाय अहवाल छायाचित्रांसह शासन निर्णयातील विहित नमुन्यात संकलित करुन जिल्हा परिषदेकडे सादर करावेत.

१०) दिनांक २४ एप्रिल, 2016 रोजी मा.पंतप्रधान महोदय ग्रामसभांना उद्देशन संबोधन करणार आहेत. यासाठी करावयाच्या उपाययोजनाबाबत या कार्यालयाचे दि.४.४.२०१६ चे पत्राद्वारे आणि शासन निर्णय दिनांक ६.४.२०१६ अन्वये दिलेल्या सूचनांची काटेकोर अंमलबजावणी करावी.

११) अभियानाच्या अंमलबजावणीसाठी जिल्हास्तरावर मा.जिल्हाधिकारी, सातारा यांचे अध्यक्षतेखाली जिल्हास्तरीय अंमलबजावणी व संनियंत्रण समिती स्थापन करण्यात आली आहे. त्याचप्रमाणे तालुकास्तरावर खालीलप्रमाणे तालुकास्तरीय संनियंत्रण समिती स्थापन करणेत येत आहे.

**तालुकास्तरीय संनियंत्रण समिती** :-

| | | |
|---|---|---|
| 1 | गट विकास अधिकारी, पंचायत समिती | अध्यक्ष |
| 2 | निवासी नायब तहसिलदार, तहसिल कार्यालय | सदस्य |
| 3 | तालुका आरोग्य अधिकारी | सदस्य् |
| 4 | गट शिक्षणाधिकारी | सदस्य |
| 5 | बाल विकास प्रकल्प अधिकारी प्रकल्प (सर्व) | सदस्य |
| 6 | तालुका कृषि अधिकारी | सदस्य |
| 7 | कृषी अधिकारी, पंचायत समिती | सदस्य |
| 8 | विस्तार अधिकारी (पंचायत), सर्व | सदस्य् |
| 9 | सहाय्यक गट विकास अधिकारी, पं.स. | सदस्य-सचिव |

वरील समितीमध्ये अभियानाच्या यशस्वी अंमलबजावणीकरिता आवश्यकतेप्रमाणे इतर विभागांच्या तालुकास्तरीय अधिकाऱ्यांना निमंत्रीत सदस्य म्हणून आमंत्रीत करता येईल.

१२) तालुकास्तरीय संनियंत्रण समितीची सभा तातडीने आयोजित करुन तालुक्यातील ग्रामपंचायतींमध्ये अभियान राबविणेसाठी कृती कार्यक्रम निश्चित करावा.

१३) शासन निर्णय दि.६.४.२०१६ मध्ये नमुद केलेनुसार निधीची उपलब्धता होणार आहे. त्यानुसार ग्रामपंचायतींनी खर्चाबाबतचे नियोजन करावे.

१४) आमचं गाव आमचा विकास कार्यक्रमांतर्गत ग्रामपंचायतीचा पंचवार्षिक व वार्षिक विकास आराखडा तयार करण्याबाबत शासन निर्णय दिनांक ४ नोव्हेंबर,२०१५ नुसार कार्यप्रणाली देण्यात आली आहे. त्यानुसार ग्रामपंचायत विकास आराखडा तयर करण्यासाठी प्रत्येक ग्रामपंचायत स्तरावर एक ग्राम संसाधन गट स्थापन करावयाचा आहे. ग्रामपंचायतीचे सदस्य, गाव पातळीवरील शासकीय कर्मचारी, स्वयंसहाय्यता गटाचे सदस्य, शेतकरी, महिला, अनु.जाती/जमाती, युवक, अपंग, पोलीस पाटील इत्यादि व्यक्ती या ग्रामसंसाधन गटाचे सदस्य असतील. संसाधन गटाची किमान सदस्य संख्या ही संबंधीत ग्रामपंचायतीच्या सदस्य संख्येच्या तिप्पट असणे अनिवार्य आहे.त्यानुसार प्रत्येक ग्रामपंचायतीने दिनांक २१ ते २४ एप्रिल, २०१६ या कालावधीत होणाऱ्या ग्रामसभेत गट संसाधन गट स्थापन करावेत.

१५) आपणास माहिती असेलच की, दिनांक १५ ऑगस्ट, २०१६ च्या ग्रामसभेमध्ये ग्रामपंचायत विकास आराखडयांना अंतीम मान्यता द्यावयाची असलेने तत्पूर्वी ग्राम संसाधन गट स्थापन करणे अनिवार्य आहे. ग्रामपंचायतीने दिनांक २१ ते २४ एप्रिल, २०१६ या कालावधीत होणाऱ्या ग्रामसभेत गट संसाधन गट स्थापन करावेत.

१६) ग्राम उदय से भारत उदय अभियान अंमलबजावणीसाठी आमचं गाव आमचा विकास कार्यक्रमांतर्गत यशदा येथे प्रशिक्षण दिलेल्या चार्ज ऑफीसर व प्रविण प्रशिक्षक , जलस्वराज्य प्रकल्पाकडील तज्ञ यांना सक्रिय करावे. ग्राम उदय से भारत उदय अभियानात ग्रामपंचायत विकास आराखडा हा मुख्य घटक असलेने, चार्ज ऑफीसर व प्रविण प्रशिक्षक यांची भुमिका महत्वाची राहणार आहे. याशिवाय राज्य स्तरीय प्रविण प्रशिक्षक म्हणून सातारा जिल्हयातील श्रीमती ज्योती सुर्वे, श्री.प्रकाश सस्ते व श्री.दिव्यराज बनसोडे यांनी प्रशिक्षण घेतले असून त्यांनाही अभियानात सहभागी करुन घ्यावे.

१७) मा.जिल्हाधिकारी, सातारा यांनी दिनांक ६.४.२०१६ च्या सभेमध्ये दिलेल्या सूचनांनुसार तालुकास्तरावर २ ते ३ प्रकारच्या ग्रामपंचायतींचे मॉडेल ग्रामपंचायत विकास आराखडे तयार करुन द्यावेत. यासाठी यशदास्तर प्रविण प्रशिक्षक, चार्ज ऑफीसर, राज्यस्तर प्रविण प्रशिक्षक यांचेसमवेत सल्लामसलत करावी.

१८) ग्राम उदय से भारत उदय अभियानाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी तालुकास्तरावर सर्व ग्रामपंचायतीचे सरपंच, उपसरपंच, ग्रामसेवक यांची बैठक आयोजित करावी व अभियानात ग्रामपंचायतींनी करावयाची कार्यवाहीबाबत माहिती देण्यात यावी.यावेळी चार्ज ऑफीसर व प्रविण प्रशिक्षक , जलस्वराज्य प्रकल्पाकडील तज्ञ यांचेमार्फत ग्रामपंचायतींन मार्गदर्शन करावे.

१९) तालुक्यातील सर्वच ग्रामपंचायतीमध्ये ग्राम उदय से भारत उदय अभियान राबवावयाचे आहे. परंतु तालुक्यातील निवडक ५ ते १० ग्रामपंचायतींमध्ये सदरचे अभियान अधिक परिणामकारक व लक्षवेधी स्वरुपात राबवावे.

२०) जिल्हयातील अभियानाचे निरिक्षण करणेसाठी राज्य शासनाचे, केंद्र शासनाचे काही अधिकारी तसेच मा.पालक सचिव, सातारा जिल्हा हे भेट देणार आहेत.भेटीचेवेळी तालुक्यात केलेल्या नियोजनाबाबत व राबविलेल्या उपक्रमाबाबतची माहिती अहवाल व छायाचित्र स्वरुपात पुरविण्यात यावी.

२१) सातारा जिल्हा परिषदेच्या खातेप्रमुखांना यापूर्वी दिनांक २८.१२.२०१५ चे आदेशानुसार तालुकानिहाय संपर्क अधिकारी म्हणून नियुक्ती देण्यात आली आहे. त्यानुसार संपर्क अधिकारी यांचेशी समन्वय ठेवून तालुक्यातील अभियानाची अंमलबजावणी करावी.

२२) दिनांक २१ ते २४ एप्रिल, २०१६ या कालावधीतील ग्रामसभेत केंद्र व राज्य शासनाच्या वैयक्तिक लाभाच्या विविध योजनांचे लाभार्थीची यादी तयार करुन त्याचे वाचन करणेबाबत संदर्भीय ४.४.२०१६ चे पत्राने

सविस्तर सूचना दिल्या आहेत. यात विशेषत्वे समाजकल्याण, महिला व बाल विकास विभाग, कृषि विभाग, अपंग कल्याणाच्या योजना इ. चे लाभार्थी निवडण्यासाठी विशेष प्रयत्न करावेत.

२३) अभियान कालावधीत शांतता कमिटीच्या बैठका आयोजित कराव्यात. त्यादृष्टीने सदर कमिटया क्रियाशील कराव्यात. गावांमध्ये दलितांवर अत्याचार होणार नाहीत, अंधश्रध्देला खतपाणी घालणारे प्रकार गावात घडणार नाहीत, जातपंचायतीच्या माध्यमातून वाळीत टाकण्यासारखे प्रकार होणार नाहीत यासाठभ् गावांमध्ये जाणीव जागृती करण्यात यावी व ग्रामसभेत चर्चा करणेत यावी.

२४) ग्रामसभेत शासन निर्णय दि.६.४.२०१६ च्या परिशिष्ट-अ मधील नमुना विषयसूचीनुसार विषयांवी ग्रामसभेत चर्चा करावी. तसेच ४.४.२०१६ चे संदर्भीय पत्रातील सूचनांनुसार केंद्र व राज्य शासनाच्या विविध योजनांची माहिती द्यावी. मानव विकास निर्देशांकानुसार आरोग्य, शिक्षण, व दरडोई उत्पन्न याअनुषंगाने चर्चा करण्यात यावी.

२५) ग्रामसभेत मनरेगा अंतर्गत स्मशानभुमी रस्ते, शोषखड्डे (डासमुक्त गाव), नॅडेप (उकिरडामुक्त गाव) अशा कामांची निवड करण्यात यावी.

२६) बहुतांश गावांमध्ये स्मशानभुमीकरिता जागा उपलब्ध नसलेने स्मशानभुमी सुविधा निर्माण करण्यात अडचणी येत आहेत. यासाठी स्मशानभुमी जागा उपलब्ध करण्याबाबतचे प्रस्ताव महसुल विभागाकडे सादर करण्याबाबतचा ग्रामसभेमध्ये उचित निर्णय घेण्यात यावेत.

उपरोक्त सूचनांची काटेकार अंमलबजावणी करुन ग्राम उदय से भारत उदय अभियान जिल्हयामध्ये प्रभावीपणे प्रभावीवरील सूचनांची काटेकोर अंमलबजावणी करावी.

मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद सातारा

प्रत :- मा.प्रधान सचिव, ग्राम विकास व जलसंधारण विभाग, महाराष्ट्र शासन, २५ मर्झबान पथ, बांधकाम भवन, फोर्ट, मुंबई -०१ यांना माहितीसाठी सविनय सादर.

प्रत :- मा.विभागीय आयुक्त, पुणे विभाग, विधान भवन, पुणे-०१ यांना माहितीसाठी सविनय सादर.

प्रत :- मा.जिल्हाधिकारी, सातारा यांना माहितीसाठी सविनय सादर.

प्रत :- माहितीसाठी सस्नेह अग्रेषित

१ ८) मा.अध्यक्ष, जिल्हा परिषद, सातारा
२ ९) मा.उपाध्यक्ष, जिल्हा परिषद, सातारा
३ १०) मा.सभापती, अर्थ, शिक्षण व क्रिडा समिती, जिल्हा परिषद सातारा
४ ११) मा.सभापती, कृषि, पशुसंवर्धन व दुग्धशाळा समिती, जिल्हा परिषद सातारा
५ १२) मा.सभापती, समाजकल्याण समिती, जिल्हा परिषद, सातारा
६ १३) मा.सभापती, महिला व बाल विकास समिती, जिल्हा परिषद सातारा.
७ १४) मा.सभापती, पंचायत समिती... (सर्व), जिल्हा सातारा